Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

36

# बाबाराव मुसळे यांच्या कथांमधील स्त्रीविषयक दृष्टिकोण

**प्रा.डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे**
**मार्गदर्शक,** मराठी विभागप्रमुख
श्रीमती एन. एन. सी. कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा ता. जि. धुळे

**श्री. प्रविण शांताराम चांदसरे**
**संशोधक**
क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

---

**प्रस्तावना :**

बाबाराव मुसळे सन १९८० नंतरच्या कालखंडातील एक नव्या दमाचे आणि दर्जेदार ग्रामीण कथा-कादंबरीकार आहेत. वास्तव जीवनाचा कलात्मक रीतीने वेध घेऊन कथेची मांडणी करण्यात त्यांची हातोटी आहे. आपण जे जगलो, जे भोगले, त्याचेच अनुभव वास्तवरूपात ते कथा-कादंबरीमधून व्यक्त करतात. म्हणूनच शेतकऱ्यांच्या व स्त्रियांच्या जीवनातील अनेक प्रसंग 'हाल्या हाल्या दुधू दे', 'पखाल' व 'वारूळ' या कथा-कादंबऱ्यांतून चित्रित झालेले आहेत. बालमनावर पडलेल्या अनेक घटनांच्या परिणामांचा प्रभावही त्यांच्या कादंबऱ्यावर पडलेला दिसून येतो. बाबाराव मुसळे यांच्या कथा-कादंबऱ्यामधील जीवनाशय विविधांगी आहे. त्यांना समकालीन जाणिवांची सखोल आणि सूक्ष्म जाण आहे. बाबाराव मुसळे कृषी व समाज जीवनाशी निगडीत विविध विषयावरील समस्यांवर, तेथील विविध प्रश्नावर व आधुनिकतेच्या रेट्यात हरपू पाहणाऱ्या माणूसपणावर लक्ष केंद्रित करून त्याला कथा-कादंबऱ्यामधून केंद्रस्थान देण्याचा प्रयत्न करतात.

**मुख्य संबोध:** प्रथितयश कवी, प्रसिद्धी, कथासंग्रह, उल्लेखनीय, शोषित, पीडित, प्रतिबिंब, पुरस्कार, संस्कृती, वास्तव.

**विषय प्रवेश :**

ग्रामीण जीवनाशी समरस होऊन ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारे एक समर्थ लेखक म्हणून बाबाराव मुसळे हे संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यातील स्त्रिया ह्या समंजस, मनमिळाऊ, कठीण परिस्थितीशी सामना करणाऱ्या आहेत. 'पाद' या कथेतील 'बायजा', 'निंदण' या कथेतील 'लीला', 'हार-जीत' या कथेतील 'सोमित्रा', 'ऊत' या कथेतील 'तिर्विणा', 'झिंगु लुखू लुखू' या कथेतील 'मीरा' आहे तसेच परित्यक्तेचे जीवन जगणारी देवकी आहे तर नवऱ्याची दारू सोडविण्यासाठी बनाव करणारी सीता आहे. ह्या स्त्रिया विदर्भातील ग्रामीण जीवनात कर्तृत्व गाजवणाऱ्या आणि परिस्थितीशी प्रखर संघर्ष करणाऱ्या आहेत. आपल्या संसाराची ठिगळे बुजवत, गावातल्या थोरा-मोठ्यांच्या समोर नम्र आणि लीन होऊन त्या माफी मागतात. वेळप्रसंगी नवऱ्याच्या लाथा बुक्क्याचा मार खाऊन संसाराला उभारी देतात. उन्हा-तान्हाचे चटके सहन करीत आपल्या मोडू पाहणाऱ्या संसाराचा डोलारा समर्थपणे पेलण्याचा प्रयत्न करतात. अर्थात त्यात त्यांना यश येत नाही. परंतु प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देण्याची हिंमत त्याच्यात आहे.

बाबाराव गंगाराम मुसळे यांचा जन्म १० जून १९४९ रोजी मैराळडोह तालुका मालेगाव जिल्हा वाशीम येथे झाला. हे एक मराठी कवी आणि लेखक आहेत.  बाबाराव मुसळे हे 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीने ते प्रसिद्धीच्या झोतात आले. या कादंबरीने ग्रामीण वास्तव आपल्या खास शैलीत टिपणारे कादंबरीकार म्हणून त्यांना मान्यता मिळवून दिली. त्यांच्या या कादंबरींचे पु. ल. देशपांडे यांनी विशेष कौतुक केले होते. दरम्यानच्या काळात बाबाराव मुसळे यांचे 'झिंगू लुखू लुखू', 'मोहरलेला चंद्र', 'नगरभोजन' हे कथासंग्रह प्रकाशित होत राहिले.

बाबाराव मुसळे यांनी संपूर्ण आयुष्य ग्रामीण भागात, तेथील समाज जीवनात व्यतीत केले आहे. ग्रामीण साहित्यात दमदार आणि कसदार साहित्याची भर त्यांनी घातली आहे. निव्वळ प्राथमिक स्तरावरचे जीवन जगणाऱ्या ग्रामीण समाजाच्या सुख-दुःखात ते सहभागी झाले आहेत. त्यामुळे त्यांनी अत्यंत निष्ठेने व तळमळीने ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्रण कथेत केले आहे. त्यांच्या कथेतील स्त्रिया संपूर्ण ग्रामीण जीवनाशी समरस झालेल्या आहेत. वेगवेगळ्या नमुनेबाज स्त्रिया त्यांनी कथेत उभ्या केल्या आहेत. त्यामध्ये पतिनिष्ठ जीवन जगणाऱ्या पैशासाठी इमान विकणाऱ्या शीलाला जपणारी, लाव्यालाव्या करणारी, एक दुसरीची फसवणूक करणारी, एक दुसरीवर परोपकार करणारी, वेळप्रसंगी दया करणारी अशा अनेक नमुनेबाज स्त्रिया त्यांनी उभ्या केल्या आहेत.

बाबाराव मुसळे यांच्या कथांमधील स्त्रीविषयक दृष्टिकोण खालील कथांच्या माध्यमातून स्पष्ट करता येईल.

**पाद :** 'पाद' या कथेतील बायजा आपली लेक मेली नसून जावई मेला आहे, असे कळताच सुटकेचा सुस्कारा टाकते. त्यानंतर तीला जावई मेल्याच्या दुःखापेक्षा आपल्या अब्रूचे रक्षण कसे होईल याचीच चिंता अधिक छळते.

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V**

**निंदण:** 'निंदण' या कथेत ग्रामीण जीवनात नातेसंबंध कसे एकमेकात पक्के गुंतलेले असतात याचे वर्णन करण्यात आले आहे. कौतिक व लीला यांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनात नातेसंबंध कसे एकमेकात पक्के गुंतलेले असतात हे दिसून येते. कौतिकची इच्छा नसताना नाते संबंधामुळे लीलाला नऊ महिन्याचा गर्भ असताना निंदायला जावे लागते. शेतात एकाएकी बाळंतपणाच्या कळा तिला येतात तेव्हा सर्वजणी पुरातून सुखरूप घरी घेऊन येतात. अशी एक दुसरीसाठी संकटात मदत करणारी स्त्री आहे.

**हार-जीत :** 'हार-जीत' या कथेत सोमित्रा व तिच्या नवऱ्यात अनेक वाद निर्माण होतात. यातूनच दोघाचे रूसवे-फुगवे, ताण-तणाव वाढतात परंतु ते क्षणिक असतात. 'संसारात बाईच्या कशाची हार ना कशाची जीत?' नवरा हरला तर बायको हरली, नवरा जिंकला तर बायको जिंकली' या विशाल तडजोडीशी येऊन भिडत आपल्या साध्यासुध्या नवऱ्याला धोतराऐवजी पायजमा घाला म्हणणारी सोमित्रा केवळ लुगडं नेसण्याच्या वादावरून माहेरी येते.[१] परंतु नंतर मात्र कौटुंबिक तडजोड स्वीकारून आनंदाने ती हिरवंगार लुगड नेसून सासरी जाते. अशा प्रकारे संसारात तडजोड व समावून घेणारी सोमित्रा आहे. पुढे तिच्या अंगी समजूतदारपणा येतो व पुढील संसाराच्या वाटचालीत नवरा सांगेल तसे वागण्याची ती शपथ घेते. सोमित्रा च्या माध्यमाने एक समजुतदार स्त्री लेखकाने हार-जीत या कथेतून उभी केली आहे.

**गुलाल :** गुलाल या कथेत एका मुस्लिम घरात हिंदू स्त्रीला आश्रय दिला जातो. हिंदू स्त्रीसाठी सय्यद नावाचा मुस्लिम व्यक्ती मारला जातो. सगळीकडे जातीय, धार्मिक कलह माजत असताना 'गुलाल' सारख्या कथेत माणुसकी दिसून येते.[२] जाती-धर्मापेक्षा माणुसकी महत्त्वाची हा संदेश लेखकाने या कथेतून दिलेला दिसून येतो.

**ऊत :** आपले तारूण्य दाबून ठेवत, होणारी जीवाची तगमग तशीच ठेवत जीवन जगणारी तिर्विणा 'ऊत' या कथेत चित्रित झाली आहे. तिर्विणाचा सगळीकडूनच मानसिक, भावनिक व शारीरिक कोंडमारा होतो. तरीही ती कुठल्याही प्रकारची कुरकुर करत नाही. तिची नवऱ्याला बोलण्याची इच्छा असूनही तिला बोलता येत नाही. थोडक्यात मन मारून जगणारी एक स्त्री म्हणून तिर्विणा 'ऊत' या कथेत चित्रित झाली आहे.

**खेळवण :** खेळवण' या कथेमध्ये सासू सुनेचं भांडण लावणारी जनाई आहे. ती सासूचे सुनेजवळ व सुनेचे सासूजवळ काहीबाही सांगते. शहराची मजा चाखण्यासाठी गेलेली गणपाची बुढी तेथे बंगल्यातील बाईसोबत भांडण करते. आपल्या खेड्यासारख्या शिव्या तिला देते.

स्वतःची इज्जत जाऊ नये म्हणून लेकीसाठी बांगड्या भरते. त्या बदल्यात घरातील दोन वेळच्या जेवणाची ज्वारी देऊन टाकते. अशी एकीकडे आर्थिक विवंचनेत सापडलेली व दुसरीकडे पोटच्या एकुलत्या एका मुलीची इच्छा पूर्ण करणारी स्त्री आहे.[३] लग्नात रूखवतावर झाकण्याच्या साडीवरून भांडण होते व देवकीला कायमचेच माहेरी राहावे लागते. असे परित्यक्तेचे जीवन देवकीच्या वाट्याला येते. नवऱ्याची दारू सोडविण्यासाठी सीता 'बनाव' करते व नवऱ्याची दारू सोडविण्यात यशस्वी होते अशी बनाव करणारी सीता दिसून येते.

**झिंगु लुखू लुखू :** 'झिंगू लुखू लुखू' या कथासंग्रहामध्ये आलेल्या विविध कथांमधून ग्रामीण भागातील कृषिप्रधान कुटुंबामध्ये हुंडा, हेवेदावे, द्वेष, व्यसन, दारिद्र्य यामुळे स्त्रियांच्या वाट्याला येणारे धगधगीत वास्तव कथेच्या विषयामधून रेखाटले आहे. मानवतेला कलंक असणारी हुंडा ही प्रथा समाजात अनेक पिढ्यांपासून मान्यता पावलेली आहे. आपली मुलगी चांगल्या घरी दिली जावी. त्यामुळे जीवाचे रान करून, वेळप्रसंगी सावकाराकडून कर्ज काढून मुलीचे लग्न साजरे केले जाते. सावकाराचे कर्ज अंगावर घेतल्यानंतर मुलगी सुखात राहावी म्हणून आयुष्यभर बाप कर्ज फेडतो; मात्र तरीही तोंडाला हुंड्याचं रक्त लागलेली माणसे मुलीचा छळ करतात. हे 'झिंगू लुखू लुखू'या कथेतून व्यक्त होते.[४] या कथेतील सुशिक्षित असलेल्या मीराचा हुंडयासाठी सासू व नवऱ्याकडून अमानुष छळ होतो. मात्र 'लोक काय म्हणतील' या भयास्तव किंवा आईवडिलाची नामुष्की होईल या भीतीमुळे आईवडिलाच्या चिंतेमुळे ती सर्व अन्याय सहन करीत राहते.

'झिंगु लुखू लुखू' बाबाराव मुसळे यांची कथा संग्रहातील शेवटची कथा आहे. या कथेत दुःखद जीवन जगणारी मीरा आहे. मीराला सासूने मनापासून छळले तरीही ती माहेरी कुठल्याही प्रकारचा गवगवा करीत नाही. उलट तिच्या स्वतःच्या भानगडीत न पडण्याची सूचना ती तिच्या आई-वडिलांना करते. ही गोष्ट अगदी नवल करण्यासारखी आहे. तिला नवऱ्याच्या लगटपणाची कीळस येऊनही त्याला शरीर अर्पण केल्याशिवाय इलाज नसल्याची स्थिती तिला व्यथित करते, व लग्नानंतर होणाऱ्या स्त्रियांची जीवनाची दशा गाणारे गीत तिला आनंदित करीत नाही. ते तिला दुःखाच्या गर्तेत नेऊन सोडते.

थोडक्यात बाबाराव गंगाराम मुसळे हे मराठी साहित्यातील एक प्रथितयश कवी आणि लेखक आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून ग्रामीण जीवनाचे वास्तव आपल्या खास शैलीत मांडले आहे. १९८५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीने त्यांना विशेष प्रसिद्धी मिळवून दिली. त्यांच्या इतर महत्त्वपूर्ण कादंबऱ्यांमध्ये 'पखाल', 'वारूळ', 'पाटीलकी', 'दंश',

'स्मशानभोग', 'आर्त', 'झळाळ' आणि 'द लास्ट टेस्ट' यांचा समावेश होतो. तसेच, 'झिंगू लुखू लुखू', 'मोहरलेला चंद्र' आणि 'नगरभोजन' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'इथे पेटली माणूस गात्रे' हा त्यांचा कविता संग्रहही उल्लेखनीय आहे.

बाबाराव मुसळे यांच्या लेखनात विदर्भातील ग्रामीण जीवनाचे विविध पैलू, शोषित आणि पीडित समाजघटकांचे संघर्ष, तसेच सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब आढळते. त्यांच्या लेखनशैलीत वऱ्हाडी बोलीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो, ज्यामुळे त्यांच्या साहित्याला एक वेगळी ओळख मिळाली आहे. त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचे आणि इतर साहित्य संस्थांचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच, ५८ व्या विदर्भ मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. बाबाराव मुसळे यांचे साहित्य मराठी वाचकांमध्ये आजही लोकप्रिय आहे आणि त्यांच्या लेखनातून ग्रामीण महाराष्ट्राचे जीवन, त्यातील संघर्ष आणि संस्कृतीचे दर्शन घडते.

**निष्कर्ष :**

१) बाबाराव मुसळे यांच्या कथेतील स्त्रिया परिस्थितीपुढं हार न मानता सतत कौटुंबिक जीवनात संघर्ष करत राहतात. त्यांच्या अंगी मुळातच सहनशीलता वसलेली आहे.

२) उलट न बोलणे, कुठेही वायफळ चर्चा न करणे, आपल्यावर होत असलेला अन्याय मुकाटपणे सहन करणे या काही चांगल्या गोष्टी त्यांच्यात आहेत.

३) बाबाराव मुसळे यांच्या कथांमध्ये सासू परिपूर्ण त्यांचे अधिकार गाजवता आहेत. सुनेला त्या अगतिक करून सोडतात. आग ओकणारी सासू व दयाळू सून तितक्याच ताकदीने बाबाराव मुसळे यांनी आपल्या कथेत उभी केली आहे.

४) बाबाराव मुसळे यांच्या कथांमध्ये अश्लील चाळे करणाऱ्या स्त्रिया दिसत नाहीत. पतिनिष्ठ जीवन जगणाऱ्याच जास्त आहेत. कोठेही शिव्यांच्या वापराचा अतिरेक झालेला नाही. अपवाद फक्त 'आपलं गाव भलं' या कथेत गणपाची बुढी शहरात गेल्यावर शिव्यांचा भडीमार करता आहे.

५) बाबाराव मुसळे यांच्या कथांमध्ये काही स्त्रिया परिस्थितीपुढं शरण जाताना दिसतात. बाबाराव मुसळे यांनी 'रूखवत', 'बांगड्या', 'झिंग लुख लुखू' या कथांतील ग्रामीण जीवनात हुंड्यापायी तरूण मुलीचा होणारा जाच मनाला अधिक भेदून जातो, व त्यांना अगतिक जीवनाला सामोरे जावे लागते.

६) 'खेळवण', 'निंदण', 'हार-जीत', 'पाद' या कथांतील स्त्रियाजवळ प्रेमळपणा, परस्पराबद्दल आपुलकी आणि कधी-कधी भांडखोरपणा दिसून येतो. अशा एकसे बढ़कर एक नमुनेबाज स्त्रिया बाबाराव मुसळे यांच्या कथांमध्ये आहेत.

**संदर्भ :**

१. मुसळे बाबाराव गंगाराम, झुंगु लुखू लुखू, मेहता प्रकाशन, पुणे – 1994, पृ. क्र. १२ (हार-जीत)
२. तत्रैव, पृ. क्र. २८ (गुलाल)
३. तत्रैव, पृ. क्र. ३६ (खेळवण)
४. तत्रैव, पृ. क्र. ४८ (झिंगु लुखू लुखू)